**संच : ब**

# शिक्षकांसाठी सूचना पाचवी : मराठी

## पायाभूत चाचणी : २०१७–१८

**इयत्ता – पाचवी**

**विषय : मराठी**

**लेखी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना** **एकूण गुण : ४०**

**प्रश्न १) शब्द ऐकून लिही.** (गुण ५)

**क्षेत्र** : लेखन (श्रुतलेखन)

**उद्दिष्ट** : जोडाक्षरसहित व जोडाक्षरविरहित शब्दांचे लेखन तपासणे.

**सूचना** :
- यादीतील शब्द सांगताना मोठ्याने वाचावा. शब्दाचा अर्थ लक्षात यावा म्हणून शब्द सलग वाचावा.
- मग २ सेकंद थांबून शब्द पुन्हा वाचावा.
- मुलांचा शब्द लिहून झाल्यावर त्याला शब्द तपासण्याची सूचना देऊन शब्द पुन्हा एकदा वाचावा.

**शब्द** :

| | |
|---|---|
| १) तारण | २) शर्यत |
| ३) विशाल | ४) सचित्र |
| ५) तुकडा | ६) चप्पल |
| ७) वैशाख | ८) दंगल |
| ९) कष्ट | १०) टॉप |

**गुणदान : प्रत्येक योग्य शब्दास अर्धा गुण याप्रमाणे गुणदान करावे.**

हा प्रश्न तपासताना खालील बाबी लक्षात घ्याव्यात. शब्द सलग लिहिला असेल व लेखननियमांनुसार बरोबर असेल तरच गुण द्यावेत. उदा. 'तारण' ऐवजी 'तारन' किंवा 'कष्ट' ऐवजी 'कशट' असे लिहिल्यास गुण देऊ नयेत.

**प्रश्न २ ते ४) हा उतारा वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)

**''दादाले सांगना ओ माय············ सखारामच्या घरी आले.**

**प्रश्न २) ब)** बबली (गुण १)

**प्रश्न ३) क)** गरिबीमुळे व गावात शाळा नसल्यामुळे (गुण २)

**प्रश्न ४)** ''दादाला सांग ना ओ माय, माले पाचवीमा जाऊ द्या. शिकू द्या. (गुण २)

(उताऱ्यातील उत्तर अपेक्षित आहे.)



*Runa GraphicsCom. 1/F- Question Paper/ Payabhut Chachani 2017-18 / Marathi/Teachers For Instructions / Std. 5/ Proof -II/19-06-17/ A/S*

## संच : ब

**प्रश्न ५ ते ७) ही कविता वाच आणि खालील प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)

**प्रश्न ५)** **ब)** वारा (गुण १)

**प्रश्न ६)** **ब)** पिंपळ, बांबू, चिंच, वड (गुण २)
(दोन किंवा दोन पेक्षा जास्त नावे लिहील्यास २ गुण द्यावेत.)

**प्रश्न ७)** हे कोण गं आई, जे मोठ्यामोठ्याने शीळ वाजवून
पाखरांना लाजवत आहे. (गुण २)
(अशा आशयाचे विद्यार्थ्यांच्या भाषेतील उत्तर स्वीकारावे. उत्तराच्या स्वरूपानुसार एक किंवा दोन गुण द्यावेत.)

**प्रश्न ८ ते १०) खालील जाहिरात वाच. त्याखा+६लील प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)

**योग्य उत्तरे व गुणदान**

**प्रश्न ८)** **ब)** पुस्तक (गुण १)

**प्रश्न ९)** होय. प्रत्येक पुस्तकावर ५०% ची घसघशीत सूट (गुण २)

**प्रश्न १०)** हो. आजोबांना जत्रेला जाता येईल. 'सर्वांसाठी प्रवेश विनामूल्य'
या वाक्यावरून समजले. (गुण २)

**प्रश्न ११)** सतीशने संत्री खाल्ली. (गुण १)

**प्रश्न १२)** मारीयाकडे वही होती. (गुण १)

**प्रश्न १३)** आई-बाबा काल गावाला गेले. (गुण १)

**प्रश्न १४)** योग्य वाक्यास एक गुण. (गुण १)

**प्रश्न १५)** १) सन्मान, अपमान पैकी कोणत्याही एका शब्दास अर्धा गुण. (गुण १)
२) सुकुमार, राजकुमार पैकी कोणत्याही एका शब्दास अर्धा गुण.

**प्रश्न १६)** ''काय गं लीला, नदी तुझ्याशी बोलते?'' (गुण १)
(दुहेरी अवतरण चिन्ह व प्रश्नचिन्ह दोन्ही दिल्यास एक गुण. दोन्ही पैकी एक दिल्यास अर्धा गुण)

**प्रश्न १७)** १) गावातील लोक चिंताग्रस्त होते. (गुण २)
२) दूरदर्शनवर 'पाणी फाऊंडेशन' विषयी मोठी बातमी.
३) सरपंचांनी बातमीवर फार विचार केला.
४) गावातील सगळे लोक एकत्र येऊन कामाला लागले.
५) सरपंचांनी लोकसहभागातून पाणी प्रश्न सोडविला.

**प्रश्न १८)** 'फळ-झाडाचे फळ, फळ-मोबदला' असे शब्दाचे दोन वेगवेगळे अर्थ असलेली दोन वाक्ये असल्यास दोन गुण द्यावेत. (गुण २)



*Runa GraphicsCom. 1/F- Question Paper/ Payabhut Chachani 2017-18 / Marathi/Teachers For Instructions / Std. 5/ Proof -II/19-06-17/ A/S*

## संच : ब

**प्रश्न १९. खाली दिलेल्या प्रसंगाच्या आधारे एक गोष्ट लिही.** (गुण ५)

**क्षेत्र :** स्व-अभिव्यक्ती (लेखन)

**उद्दिष्ट :** स्व-अभिव्यक्ती तपासणे.

**गुणदान :** प्रमाण भाषेचा वापर अपेक्षित नाही.

| गुण | निकष |
|---|---|
| ० | केवळ शब्द लिहिणे किंवा काहीही न लिहिणे. |
| १ | यांत्रिकरीत्या एकच वाक्य शब्द बदलून लिहिणे किंवा सुसंगत नसणारे विस्कळीत लेखन. |
| २ | त्रोटक किंवा अर्ध्यामुर्ध्या शब्दातील लेखन. वाक्यरचना काही ठिकाणी तरी नीट आहे. |
| ३ | संपूर्ण प्रसंगाचा एकत्र विचार करून सलगपणे केलेले लेखन. |
| ४ | प्रसंगाच्या तपशिलात भर घालून प्रसंगातील पात्रांना नावे देऊन गोष्ट लिहिली आहे. |
| ५ | प्रसंगाच्या तपशिलात भर घालून प्रसंगातील पात्रांना नावे देऊन गोष्ट लिहिली आहे. पात्रांच्या तोंडी संवाद/बोलणे घातले आहे. |

**प्रश्न २०. खाली काही शब्द दिले आहेत. त्या शब्दांच्या आधारे गोष्ट तयार करून लिही.** (गुण ५)

**क्षेत्र :** स्व-अभिव्यक्ती (लेखन)

**उद्दिष्ट :** स्व-अभिव्यक्ती तपासणे.

**गुणदान :**

| गुण | निकष |
|---|---|
| ० | काहीही लिहिलेले नाही किंवा केवळ शब्दलेखन. |
| १ | शब्दांची नुसती सुटी सुटी वाक्ये लिहिलेली आहेत. वाक्यात सलगता नाही. |
| २ | दिलेल्या शब्दांवरून संदर्भ घेऊन सलग लेखन, काही वेळा वाक्यरचना विस्कळित असू शकेल, गोष्ट नाही, त्रोटक लेखन. |
| ३ | दिलेल्या शब्दांचा संदर्भ लक्षात घेऊन गोष्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. |
| ४ | दिलेल्या शब्दांचा संदर्भ लक्षात घेऊन सुसंगत अर्थपूर्ण लेखन. गोष्टीला सुरुवात आणि शेवट आहे. |
| ५ | दिलेल्या शब्दांचा संदर्भ लक्षात घेऊन सुसंगत अर्थपूर्ण लेखन. गोष्टीला सुरुवात आणि शेवट आहे. खुलवण्यासाठी बारकावे व तपशील दिले आहेत. वेगवेगळ्या पात्रांना भूमिका/संवाद दिलेले आहेत. |



*Runa GraphicsCom. 1/F- Question Paper/ Payabhut Chachani 2017-18 / Marathi/Teachers For Instructions / Std. 5/ Proof -II/19-06-17/ A/S*

**संच : ब**

**तोंडी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना** **एकूण गुण : १०**

**तोंडी प्रश्न १) खालील उताऱ्याचे प्रकट वाचन करून घेणे.** (गुण ५)

**प्रश्नकर्त्यासाठी सूचना :**

- हा प्रश्न प्रकट वाचनाचे कौशल्य तपासण्याबरोबरच मुलाचे आकलन तपासण्यासाठी आहे.
- हा प्रश्न तोंडी असल्याने एकेका विद्यार्थ्याला जवळ बोलावून विचारायचा आहे.
- वर्गात जास्त मुले असल्यास दोन ते तीन दिवसात चाचणीचा हा भाग पूर्ण करता येईल.

**प्रश्नकर्त्याने देण्याची सूचना** : मी तुला एक उतारा वाचायला देणार आहे. तो उतारा मोठ्या आवाजात वाच. मग मी काही प्रश्न विचारणार आहे. त्यांची उत्तरे तू द्यायची.

**उतारा :**

**रोझी दुपारी शाळेतून घरी आली. आई-बाबा लग्नाला गेले होते. रोझीने कुलूप उघडले. घरात येऊन तिने कपडे बदलले, हातपाय धुतले व आईने ठेवलेला खाऊ खाल्ला. थोड्याच वेळात ढग दाटून आले. वीजांचा कडकडाट व ढगांच्या गडगडाटाने रोझीला भीती वाटू लागली. तिने पटकन दारे-खिडक्या बंद केल्या.**

**बाहेर पडत असणाऱ्या पावसावर तिने छान कविता तयार केली. तयार कविता ती गुणगुणू लागली. तेवढ्यात दारावरची बेल वाजली. रोझीने दार उघडले. समोर आई-बाबांना पाहून तिची भीती दूर पळाली.**



*Runa GraphicsCom. 1/F- Question Paper/ Payabhut Chachani 2017-18 / Marathi/Teachers For Instructions / Std. 5/ Proof -II/19-06-17/ A/S*

# संच : ब

**वाचनासाठी गुणदान :**

| गुण | निकष |
|---|---|
| ० | मुलाने उतारा वाचण्यात रस दाखवला नाही, मदत करूनही वाचता आले नाही. |
| १ | मदत करून काही शब्दांचे वाचन, वाचनातून वाक्याचा बोध नाही. |
| २ | मदत न करता शब्दांचे वाचन. वाचनातून वाक्याचा बोध नाही. |
| ३ | उताऱ्याचे प्रयत्नपूर्वक वाचन. आधी मनात वाचून मग प्रकट वाचन चालेल. वाचनातून वाक्याचा बोध होतो आहे. |
| ४ | काही वाक्यांचे स्वराघातासह प्रकट वाचन. |
| ५ | उताऱ्याचे स्वराघातासह प्रकट वाचन. गती महत्त्वाची नाही, वाक्यांचे परत वाचन चालेल. |

**आता मुलाने वाचलेल्या उताऱ्यावर आधारित खालील प्रश्न विचारणे.** (गुण ५)

**गुण** **योग्य उत्तर**

**तोंडी प्रश्न २) रोझीचे आई–बाबा कोठे गेले होते?** (१) (क)

अ) बाजारात

ब) गावाला

क) लग्नाला

**तोंडी प्रश्न ३) रोझीला भीती का वाटू लागली?** (२) (ब)

अ) ती घरी एकटी असल्यामुळे.

ब) वीज व ढगांच्या आवाजाने.

क) घरातील वीज गेल्यामुळे.

**तोंडी प्रश्न ४) रोझीला कोणत्या गोष्टीचा छंद असावा? उताऱ्यातील कोणत्या वाक्यावरून तुला हे समजले?** (२)

(कवितेचा. बाहेर पडत असलेल्या पावसावर तिने छान कविता तयार केली.)

■■■



*Runa GraphicsCom. 1/F- Question Paper/ Payabhut Chachani 2017-18 / Marathi/Teachers For Instructions / Std. 5/ Proof -II/19-06-17/ A/S*